# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६,　　विस्तार क्र.२२५　　proumc321@gmail.com


दिनांक : २५/०६/२०२४

# प्रेसनोट

उल्हासनगर महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांचा **शाळा प्रवेशोत्सव आणि शैक्षणिक साहित्य वितरण समारंभ** मंगळवार दिनांक २५ जुन, २०२४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका, अभ्यासिका हॉल, तिसरा मजला, उल्हासनगर-३ येथे उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत आयोजित करण्यात आला होता.

**उपस्थित अधिकारी :-**

- मा. श्री. अजीज शेख, आयुक्त तथा प्रशासक, उ.म.पा..
- मा. श्री. जमीर लेंगरेकर, अतिरिक्त आयुक्त, उ.म.पा.
- मा. डॉ. सुभाष जाधव, उप आयुक्त (शिक्षण), उ.म.पा.
- मा. श्री. दिपक धनगर, प्रशासन अधिकारी (शिक्षण), उ.म.पा.
- मा. श्रीम. निलम कदम, उप मुख्य लेखाधिकारी, उ.म.पा.
- मा. श्रीम. छाया डांगळे, जनसंपर्क अधिकारी, उ.म.पा.

सदर कार्यक्रमाची सुरुवात दिप प्रज्वलन व प्रतिमा पुजनाने करण्यात येवून, समारंभा दरम्यानमा. श्री. अजीज शेख, आयुक्त तथा प्रशासक, उ.म.पा. तसेच सर्व उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश, वह्या, दप्तर, बूट व मोजे, रेनकोट, लेखन साहित्य, पाण्याची बॉटल तसेच जेवणाचा डब्बा इत्यादी साहित्यांचे मोफत वितरण करण्यात आले.

या प्रसंगी मा. श्री. अजीज शेख, आयुक्त तथा प्रशासक, उ.म.पा. यांनी आपले मनोगत व्यक्त करुन विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन केले व पुढील वाटचालीकरीता मनापासून शुभेच्छा दिल्या आहेत. तसेचउल्हासनगर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत शाळेतील विद्यार्थ्यांकरीताखालीलप्रमाणे सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे सांगितले :-

- महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ तसेच महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्यामार्फत वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनेनुसार वेगवेगळे उपक्रम / कार्यक्रम महानगरपालिकेच्या शाळेमार्फत राबविण्यात येतात.
- उल्हासनगर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत असणाऱ्या सर्वशाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाकरीता क्रिडा महोत्सव व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.
- उल्हासनगर महानगरपालिकेच्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांकरीता नि:शुल्क दरवर्षी सहलीचे आयोजन करण्यात येते.
- उल्हासनगर महानगरपालिकेतील शाळेमध्ये शैक्षणिक कामगिरीमध्ये लक्षणीय सुधारणा करण्याकरीता तसेच डिजिटलाईज पध्दतीने शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांच्यावर लक्ष ठेवण्याकरीता Teachers & Students Monitoring Solution व Teachers & Students Performance Analysis Solution या उपक्रमाच्या सहाय्याने प्रायोगिक तत्वावरविविध चार शाळा डिजिटलाईज करण्यात आल्या आहेत.
- उल्हासनगर महानगरपालिकेतील प्रायोगिक तत्वावर विविध पाच शाळा ISO ९००१ गुणवत्ता प्रणाली प्रमाणन करण्यात आले आहे.
- सर्व शाळांमध्ये सुरक्षिततेच्यादृष्टीकोनातून सी.सी.टी.व्ही.कॅमेरा व इंटरनेटचीसुविधा उपलब्ध करुन देण्यातआलेली आहे.
- उल्हासनगर महानगरपालिकेच्या शाळेमध्ये Limeneal Wheel या उपक्रमाच्या सहाय्याने विद्यार्थ्यांकरीता पोषक तथा आनंदीशैक्षणिक वातावरण निर्माण होण्याकरीता उल्हासनगर महानगरपालिकेच्या शाळेतील शिक्षकांचे मुल्यांकन व कार्याशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

तद्नंतर कार्यक्रमाच्या शेवटी सर्व मान्यवरांचे आभार मानुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.